# अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ अमरावती

म्हाडा MHADA

गृहनिर्माण भवन, टोपे नगर,अमरावती.

(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा प्रादेशिक घटक)

## अकोली, अमरावती येथील म्हाडा सदनिकांची – जाहीरात २०२२

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ च्या अंतर्गत (भू–विनियोग) नियम–१९८१, आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण, गाळ्यांची अदलाबदल ) विनिमय १९८१ तसेच (भू–विनियोग) विनियम–१९८२ यामधील तरतुदी व प्राधिकरणाचे अधिनियमांत व विनियमांत वेळोवेळी केलेल्या सुधारणांचे अधिन राहून तसेच केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या अटी व शर्तीस अनुसरुन मुख्य अधिकारी अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, अमरावती यांचेकडून खालील सदनिकांच्या प्रथम येणाऱ्यास प्रथम या तत्वावर वाटपाकरिता इच्छुक व पात्र व्यक्तिकडून विहित नमुन्यात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटाकरिता स्थानिक प्राधीकरण म.न.पा./अमरावती यांचे सर्वेक्षणामध्ये घटक–३ अंतर्गत केलेल्या नोंदणीनुसार पात्र लाभार्थ्यांकडून अग्रीम अंशदान तत्वावर खालील नमूद केल्याप्रकरणी उपलब्ध सदनिकांकरिता विहित नमुन्यांत अर्ज मागविण्यात येत आहे.

–अर्ज भरणे व स्विकृतीचे वेळापत्रक–

१) अर्ज विक्री दिनांक :– २२/०९/२०२२ सकाळी ११.०० वा. पासून ते सदनिका संपेपर्यंत २) अर्ज स्विकृती दिनांक :– २३/०९/२०२२ सकाळी ११.०० वा. पासुन ते सदनिका संपेपर्यंत (सार्वजनिक सुट्ट्या वगळून)
३) अर्जाची किंमत :– रुपये ३००/–+जी.एस.टी.रु.५४/– एकुण रुपये ३५४/– (विना परतावा) ४) अर्ज विक्रीचे ठिकाण :– अमरावती गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, गृहनिर्माण भवन, मालटेकडी समोर, टोपे नगर,अमरावती येथे कार्यालयीन वेळेत.
५) अत्यल्प उत्पन्न गट (EWS) कौटुंबिक मासिक उत्पन्न मर्यादा रु. ३७,५००/– पर्यंत सन १/४/२०२१ ते ३१/०३/२०२२ चे उत्पन्न प्रमाणपत्र (शासन निर्णय क्र.प्रआयो–२०१९/प्र.क्र.१२६/गृनियो–२ दि. १४/०६/२०२२ अन्वये) अर्जासोबत भरावयाची अनामत रु. ८८०००/–, तसेच उर्वरित संपूर्ण रक्कमेचा भरणा विहित मुदतीत केल्याशिवाय सदनिकेचे वाटप करण्यात येणार नाही.

| अ. क्र. | योजनेचा संकेत क्रमांक | योजनेचे नांव | योजनेच्या सदनिकांची संख्या | योजनेची जाहीरात संख्या व प्रकार | अंदाजीत विक्री किंमत (रु.लक्ष) | शासनाचे अनुदान प्रती सदनिका (रु. लक्ष) | अंदाजीत प्रती सदनिका उर्वरित रक्कम (रु. लक्ष) अनुदान वगळून | इमारतीचे व सदनिकेचे स्वरुप | सदनिकेचे अंदाजीत चटई क्षेत्रफळ (चौ.मी.) | अनुसूचित जाती व नवबौध्द | अनुसूचित जमाती | भटक्या जमाती | विमुक्त जाती | पत्रकार | स्वातंत्र्य सैनिक | कलाकार | म्हाडा कर्मचारी | अंध किंवा शारीरिक दृष्ट्या अपंग | माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ति | संरक्षण दलातील लढाईत मृत झालेल्या कुटुंबिय अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी | महाराष्ट्र राज्यातील मतदार संघाचे प्रतिनिधित्व करणारे मा. लोकसभा, मा. विधानसभा व मा. विधान परिषदेचे विद्यमान व माजी सदस्य. | राज्य शासनाचे व राज्य शासनाच्या नियंत्रणा खालील संविधानिक मंडळे,महामंडळे इत्यादींचे तसेच अगोदर निवृत्त झालेले कर्मचारी | शासकीय निवासस्थानात आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदर सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र शासनाचे कर्मचारी | सर्व साधारण जनता | वाटपास एकुण सदनिका /गाळे/ बंगले | महारेरा क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. | २०. | २१. | २२. | २३. | २४. | २५. | २६. | २७. |
| १. | १०१ | ६७४ सदनिका अत्यल्प उत्पन्न गट, अकोली अमरावती. | ६७४ | प्रथम येणाऱ्यास प्रथम | ११,२३,२५०/– | २.५/– लक्ष | ८,७३,२५०/– | पार्किंग +३ | २९.७२ चौ.मी. | ७४ | ४१ | १० | १० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५३९ | ६७४ | P–५०३०००१५१२० |

टिप :– सदरहू योजनेतील अत्यल्प उत्पन्न गटातील योजनेचे वाटप प्रधानमंत्री आवास योजनेसाठी विहीत असणाऱ्या अटी व शर्तीचे अधीन राहून सदनिका वाटप करण्यात येईल. सदर योजनेच्या वाटपाची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता राहील. अर्जदाराचा याबाबतचा कोणताही आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घटक–३ अंतर्गत महानगर पालिकेकडे/नगर परिषदेकडे नोंदणी करुन पात्रता निश्चित झाल्याचे पत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतरच अर्ज स्विकारले जातील याची नोंद घ्यावी.

अर्ज भरण्यासाठी आवश्यक पात्रता तसेच अटी व शर्ती :–

१) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी बांधण्यात येणाऱ्या गाळा/सदनिकासाठी लाभार्थी/अर्जदार कुटुंबामध्ये पती–पत्नी व अविवाहित मुले यांचा समावेश असेल तसेच अत्यल्प उत्पन्न गटातील गाळा/सदानिकासाठी कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील. २) अत्यल्प उत्पन्न गटासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अर्ज करतांना अर्जदार व अर्जदाराच्या कुटुंबाच्या नावे भारतात कुठेही घर/गाळा/सदनिका रहिवाशी भूखंड नसावा. ३) अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्ष पुर्ण असावे व अर्जदार कमावती/ता व्यक्ति असावी. ४) जाहीरातीच्या दिनांकापासून अर्जदार मागील २० वर्षापर्यंत सलग १५ वर्षे महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. ५) अर्जदारास एका संकेतातील एकाच आरक्षण गटामध्ये एकापेक्षा जास्त अर्ज करता येणार नाहीत, असे आढळल्यास असे अर्ज तपासणी अंती रद्द केल्या जातील. ६) अर्ज सादर करतांना अर्जदाराचे स्वत:चे नावे बँक खाते/क्रमांक असणे आवश्यक आहे. दुसऱ्याचे, एन.आर.आय., चालु खाते तसेच (पती–पत्नी वगळता) संयुक्त बँक खाते क्रमांक वापरता येणार नाही. या अटीचा भंग केल्यास असे अर्ज रद्द करण्यात येईल. ७) अमरावती मंडळाने सदनिका वितरणाचे देकार पत्र दिल्यानंतर लाभार्थ्याने आपला अर्ज मागे घेतल्यास गाळ्याच्या मुळ किंमतीच्या १ टक्के रक्कम कपात करण्यात येईल तथापी अर्जदाराने आपला अर्ज देकारपत्र देण्यापुर्वी मागे घेतल्यास अनामत रक्कमेमधून रुपये १०००/– प्रशासकीय खर्च वजा करुन बाकी रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल. अनामत रक्कमेवर कुठलेही व्याज देय असणार नाही. ८) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटाकरिता पात्र लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाने मुद्रांक शुल्कात खास सवलत जाहीर केली असून फक्त रुपये १०००/– मुद्रांक शुल्क देय राहील व मुद्रांक शुल्काचा भरणा केल्यानंतर सदनिकेचा ताबा देण्यात येईल. ९) सामाजिक आरक्षणातील अर्जदाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. १०) अपूर्ण भरलेले, खाडाखोड असलेले व विहित मर्यादित उत्पन्न नसलेल्या व आवश्यक कागदपत्रे नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. प्रधान मंत्री आवास योजनेअंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी संबंधीत महानगर पालिकेकडे/नगर परिषदेकडे नोंदणी करणे आवश्यक राहील व घटक ३ मध्ये पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय अर्ज स्विकारले जाणार नाहीत. ११) सदनिकेची/गाळ्याची किंमत/गाळ्यांची संख्या/ क्षेत्रफळ अंदाजित असुन त्यात भविष्यात बदल झाल्यास, झालेले बदल अर्जदारास बंधनकारक राहील. १२) जाहीरातीत नमूद अंदाजित विक्री किंमती मध्ये करांचा समावेश नाही. सेवा व वस्तुकर (GST) व शासनाचे इतर लागू असलेले कर तसेच योजना असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे जसे कि, महानगरपालिका/ नगरपरिषद/ ग्राम पंचायत यांचे मिळकत कर व सेवाशुल्क तसेच इतर लागू असलेले कर गाळेधारकास भरणे बंधनकारक राहील. १३) पात्र अर्जदारास सदनिका ताब्यात घेण्यापुर्वी ३० वर्षाचे भांडवलीकरण करुन येणाऱ्या भु–भाडे अथवा मासिक भूभाड्याच्या रक्कमेचा भरणा करणे बंधनकारक राहील. तसेच नियमानुसार प्रतिवर्ष अकृषक कराचा भरणाही करावा लागेल व त्यावर लागणारा सेवा व वस्तु कराचा (GST) भरणा करावा लागेल. १४) अर्जदाराचे स्वत:चे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे. तसेच ताबा घेण्यापुर्वी आधारकार्ड (UID) नंबर सादर करणे आवश्यक आहे. पात्रतेसाठी इतर अटी व शर्तीचा उल्लेख तसेच आरक्षण गटाचे विवरण इत्यादी अर्ज भरण्यापुर्वी माहिती पुस्तिकेत विस्तृतपणे स्पष्ट करण्यात आली आहे. सर्व अर्जदारांनी माहिती पुस्तिकेचा सखोल अभ्यास करावा. माहिती पुस्तिकेमध्ये दिलेल्या अटी व शर्ती नुसार अर्जदार पात्रतेची पुर्तता पूर्ण करीत असल्यासच अर्जदारांनी अर्ज सादर करावा. अर्जदारास कुठलेही कारण न देता अर्ज रद्द/अपात्र करण्याचा अधिकार मंडळास असेल. १५) स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रधानमंत्री आवास योजना घटक–३ अंतर्गत झालेल्या सर्वेक्षणामध्ये अर्जदार पात्र झाल्याशिवाय अर्जदारास शासनाचे रुपये २.५ लक्ष अनुदानाचा लाभ मिळणार नाही. १६) माहिती पत्रिकेतील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदारास बंधनकारक राहील. १७) जाहीरातीमध्ये अनावधाने झालेल्या छपाईच्या चुकांचा कोणत्याही प्रकारे अर्जदारास फायदा घेता येणार नाही. १८) मुख्य अधिकारी अमरावती मंडळ यांनी कारण न देता अर्ज स्विकारणे व नाकारणे किंवा योजना रद्द करण्याचे किंवा योजनेत बदल करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. १९) उपलब्ध गाळ्यांच्या संख्येत फेरबदल संभवनीय आहे. यापुर्वीच्या जाहीरातीद्वारे प्राप्त व सोडतीद्वारे यशस्वी झालेल्या अर्जदारांसाठी योजनेत बदल करण्याचे अधिकार राखुन ठेवलेले आहे. १९) उपलब्ध गाळ्यांच्या संख्येत फेरबदल संभवनीय आहे. यापुर्वीच्या जाहीरातीद्वारे प्राप्त व सोडतीद्वारे यशस्वी झालेल्या अर्जदारासाठी उपलब्ध असलेल्या सदनिकांवर या जाहीरातीद्वारे प्राप्त अर्जदारांना दावा/मागणी करता येणार नाही. मंडळाकडे उपलब्ध सदनिकांमधुन मंजुर रोष्टरचे आधारे गाळ्यांचे वाटप करण्यात येईल. योजनेच्या ठिकाणी प्रत्यक्ष मोक्यावर जाऊन अर्जदारांनी योजनेचे ठिकाण, गाळ्यांचे स्थिती याचीपाहणी करावी. २०) सदर योजनेकरिता म्हाडा कडून यापुर्वी जाहीरात प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत. त्या जाहीरातीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जदारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल याची नोंद घ्यावी. २१) सुधारित कमाल उत्पन्न मर्यादा रुपये वार्षिक, अत्यल्प उत्पन्न गट (EWS), मुंबई, पुणे, नागपुर महानगरपालिका क्षेत्र तसेच १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्र वगळता उर्वरित महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत अनुज्ञेय क्षेत्रफळ (निव्वळ चटई क्षेत्र) Carpet area, ३० चौ.मि. पर्यंत, रुपये ४,५०,०००/– पर्यंत वार्षिक. (शासन निर्णय क्र. प्रयाओ–२०१९/प्र.क्र. १२६/गृनियो–२ डि. १४/०६/२०२२ अन्वये) नुसार राहील. २२) अर्जदाराने उत्पन्नाबाबत आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सादर करण्याची जबाबदारी संबधित अर्जदाराची राहील. जसे नोकरी करित असल्यास १२ महिन्याचे सॅलरी स्लिप, नोकरी करित असलेल्या कार्यालयाकडून प्राप्त वेतन प्रमाणपत्रक, आयकर विवरणपत्र सन २०२१–२२ चे, अर्जदार व्यवसाय करीत असल्यास, आयकर विवरण पत्र सन २०२१–२०२२, नफा तोटा खाते/बॅलन्स शिट/ट्रेडिंग A/c इत्यादी तसेच कार्यालयाने वेळोवेळी मागणी केल्यानंतर उत्पन्नासंबंधी व इतर कागदपत्रे. अपूर्ण असलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. २३) या योजनेकरिता यापुर्वीच्या जाहीरातीनुसार ज्या अर्जदारांनी मंडळाच्या कार्यालयात अर्ज सादर केलेले आहेत, त्यांना पुन्हा अर्ज सादर करण्याची गरज नाही. त्यांच्या कागदपत्राची तपासणी अंती जे अर्जदार पात्र होतील त्यांच्या अर्जावर वाटपासंबंधी पुढील कार्यवाही कक्षरण्यात येईल. २४) सदर योजनेला अद्यापर्यंत भोगवटा प्रमाणपत्र स्थानिक स्वराज्य संस्थेकडून प्राप्त झालेले नाही. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच प्रत्यक्ष सदनिकेचे वाटप करण्यात येईल यांची अर्जदारानी नोंद घ्यावी. २५) सदनिकेची जाहीरातीमध्ये दर्शविण्यात आलेली अंदाजीत विक्री किंमत ही डिसेंबर २०२२ पर्यंत व्याजाचे भांडवली करण करुन परिगणित करण्यात आलेली आहे. ती डिसेंबर–२०२२ पर्यंत वाटप करण्यात येणाऱ्या सदनिकेधारकास लागू राहील. डिसेंबर–२०२२ नंतर सदनिका वाटपाकरिता कार्यकारी अभियंता/अम. मं. यांच्या विभागाकडून प्राप्त होणारी अद्यावत/तात्पुरती विक्री किंमती नुसार सदनिकेची रक्कम अर्जदारास भरणे बंधनकारक असेल व त्यानंतरच सदनिकेचे वाटप करण्यात येईल. सदर गाळेधारकाचे वाटप मंजूर रोस्टर नुसार करण्यात येईल. त्यामध्ये बदल होणार नाही. २६) अर्जदारास अर्ज सादर करतांना कागदपत्राची तपासणी नंतर पात्रता निश्चिती नंतर अर्जासोबत रुपये ८८,०००/– चा धनाकर्ष राष्ट्रीयकृत बँक/शेड्युल सहकारी बँकेचा मुख्य लेखाधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, अमरावती या नावे अमरावती येथे देय असणारा असावा तसेच उर्वरित संपूर्ण रक्कमेचा भरणा केल्याशिवाय गाळ्याचा ताबा देण्यात येणार नाही. अर्जासोबत स्थानिक महानगर पालिका अमरावती मध्ये घटक ३ अंतर्गत पात्र असल्याचे पत्र जोडण्यात यावे. त्याशिवाय अर्ज स्विकारल्याजाणार नाही याची नोंद घ्यावी. २७) शा.नि.क्र. २०१९/ प्र.क्र.६६/ गृनिप दिनांक ११/०९/२०१९ नुसार शासनाचा किंवा शासन अधिनस्त कोणत्याही प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अथवा शासकीय गृहनिर्माण योजनेत पती–पत्नी व अज्ञान मुले यांचे नावे लाभ घेतला नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

महत्वाची सूचना :–

सदनिकांच्या वितरणासाठी व अर्ज विक्री करण्यासाठी अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणुन नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही व्यक्तिशी परस्पर व्यवहार करु नये. तसे केल्यास कोणत्याही व्यवहारास/फसवणूकीस अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/म्हाडा जबाबदार राहणार नाही.

स्वा/–
(महेशकुमार मेघमाळे)
मुख्य अधिकारी
अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,अमरावती

## माहीती पत्रक, ६७४ गाळे अत्यल्प उत्पन्न गट, प्रधानमंत्री आवास योजना,अकोली,अमरावती

### महत्वाची टीप

१) गाळयाचे क्षेत्रफळ व बांधकामाचे क्षेत्रफळ यांत फेरबदल होऊ शकतो तसेच सदरहु किंमतीमध्ये, प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी बदल संभवनीय आहे. व सदर बदल झाल्यास तो अर्जदारास बंधनकारक राहील त्यावर अर्जदारास कोणत्याही प्रकारचा उजर राहणार नाही.

२) अर्ज पात्रते संबधाता आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे व पात्र अर्जच स्विकारले जातील. अर्जदारांनी पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक आहे. पत्ता बदलल्यास नविन पत्ता मंडळास कळविणे अनिवार्य आहे, मंडळाचा पत्रव्यवहार अर्जदारास पत्ता बदलल्यामुळे न प्राप्त झाल्यास, व अर्ज रदद झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदारांवर असेल. तसेच दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक अर्जामध्ये नमुद करावा.

३) अर्जदारांचे बँकमध्ये स्वत:चे नावे अकांऊट असणे आवश्यक आहे. अर्जामध्ये बँकेचा पत्ता याचा उल्लेख असावा. सदर तपशील अर्जातील पत्याच्या खाली नमुद करावा अर्जाचे वर उजव्या कोप-यामध्ये अर्जदाराने स्वत:चे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिकटवावे.

४) गाळेधारकाकडून गाळयाच्या देखभालीकरीता कोणत्याही प्रकारची रक्कम वसूल करण्यात येत नाही. त्यामुळे गाळयांचा ताबा मिळाल्यानंतर गाळयाची देखभाल व दुरुस्ती गाळेधारकास स्वखर्चाने करावी लागेल. योजनेचा सर्व तपशील, उत्पन्न मर्यादा याची अर्जदारांनी काळजीपूर्वक माहीती नोंदवावी. गाळा/भूखंड वाटप झाल्यानंतर नियमितपणे भू-भाडे व इतर रक्कमेचा भरणा करावा लागेल. विलंब झाल्यास विलंब शुल्क नियमानुसार देय राहील याबाबत अर्जदाराचा कुठलाही उजर राहणार नाही.

५) या योजनेतील गाळेधारकानी त्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करावी लागेल. सर्व संयुक्त सोयी सहकारी संस्थेला हस्तांतरीत करण्यात येतील व त्याची देखभाल संस्थेला करावी लागेल. संस्थेचे सर्व कार्यभार संस्थेला सांभाळावा लागेल. गाळेधारकास विजेचे मिटर व पाण्याचे मिटर स्वत:ला स्वखर्चाने घ्यावे लागेल आणि त्याचे भाडे तसेच स्थानिक महानगर पालीकेचे कर (टॅक्स), पाण्याचे देयके गाळेधारकास स्वखर्चाने भरावी लागतील. तसेच अकृषक करापोटी देय रक्कम अर्जदारास वेगळी भरावी लागेल. गाळे/भुखंड ताबा घेतांना शासन नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क भरणा करावा लागेल.

६) अर्जदारास सोडतीपूर्वी अनामत रक्कम परत घ्यावयाची असल्यास रुपये १०००/- प्रशासकीय शुल्क कपात करुन परत केली जाईल. त्याकरीता ...ळ कार्यालयास अर्ज करून अनामत रक्कम भरल्याची मूळ पावती सादर करावी लागेल. देकार पत्र दिल्या नंतर रक्कम परत पाहिजे असल्यास एकूण गाळयाच्या /भूखंडाच्या किंमतीच्या १ टक्का रक्कम कपात करुन उर्वरीत रक्कम परत केल्या जाईल. मंडळाकडील अनामत रक्कमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही, तसेच अनामत रक्कम परतावा धनादेशव्दारे करण्यात येईल. रोखीने करण्यात येणार नाही. योजनेस पुरेसा प्रतिसाद मिळाल्यासच योजना कार्यान्वीत होईल अन्यथा अर्जासह भरणा केलेली रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल.

७) गाळयाची संपूर्ण किंमत रु.११,२३,२५०/- वजा शासन अनुदान रु.२,५०,०००/- = ८,७३,२५०/- वजा अर्जासोबत भरावयाची रक्कम रु.८८,०००/- = ७,८५,२५०/- खालील मुदतीत भरावयाची आहे. अर्जदारास देकार पत्र दिल्यानंतर देकारपत्राच्या तारखेपासून खालील प्रमाणे रक्कमेचा भरणा करणे गरजेचे आहे.

| टप्पा | भरावयाची रक्कम | मुदत |
|---|---|---|
| १ | सदनिकेच्या एकूण किंमतीच्या २५ % रक्कम | देकार पत्राच्या दिनांका पासून ४५ दिवसांत रक्कम भरणे बंधनकारक आहे. |
| २ | उर्वरित ७५ %रक्कम | टप्पा १ च्या मुदतीनंतर पुढिल ६० दिवसात रक्कम भरणे बंधनकारक आहे. |

**टप्पा १)** सदरचे तात्पुरते देकारपत्र पोस्टामार्फत दिले जाणार असल्याने या पत्राच्या दिनांकापासून ४५ दिवसात सदनिकेच्या २५ % रक्कम (अनामत रक्कम वजा करून येणारी रक्कम)भरणे बंधनकारक आहे. सदर कालावधी संपुष्टात आल्यानंतर (ताप्पुरते देकारपत्र दिनांकाच्या ४५ दिवसांनंतर)अधिकतम १५ दिवसांची मुदतवाढ प्राधिकरणाच्या नियमानुसारच्या दराने रक्कमेवर व्याज आकारणीसह देण्यात येईल.(व्याज दरातील बदल अर्जदारास बंधनकारक राहील) यामध्ये कसूर केल्यास गाळयाचे वितरण पूर्व सुचने शिवाय ही मुदत संपताक्षणी रद्द करण्यात येईल.

**टप्पा २)** टप्पा १ च्य मुदतीनंतर पुढिल ६० दिवसात सदनिकेची उर्वरित रक्कम ७५% रक्कम भरणे बंधनकारक आहे. जर सदनिकेची किंमत १५०ात मुदतीत अदा करणे शक्य नसेल तर किंमत भरण्यासाठी टप्पा क्र.२ मध्ये नमूद केलेल्या विहीत कालावधीच्या आत मुख्य अधिकारी अमरावती मंडळ यांच्या मुदतवाढीसाठी अर्ज करता येईल. मुख्य अधिकारी,अमरावती मंडळ यांना योग्य वाटल्यास योजनेच्या दराने व्याजासहीत मुदतवाढ जास्तीत जास्त ९० दिवसांपर्यंत देण्यात येईल. या ९० दिवसांच्या कालावधीकरीता एकूण किंमतीपैकी अदा करावयाच्या रक्कमेवर प्राधिकरणाच्या नियमानुसार दराने व्याज आकारणीसह देण्यात येईल.(व्याज दरातील बदल अर्जदारास बंधनकारक राहील).

८) भू-भाडयाच्या तीनपट रक्कम सुरक्षा ठेव म्हणुन गाळा वाटपाचे वेळी वसुल करण्यात येईल. भू-भाडे/ अकृषक कर दरमहा/ वार्षीक आकारण्यात यईल. सदरचा दर परिवर्तनीय असुन कायम स्वरुपी भरावा लागेल.

९) योजनेच्या सर्व विवरणात फेरबदल संभवनीय असुन योजनेचे स्वरुप बदलविणे/ योजना रदद करण्याचे पुर्ण अधिकार मुख्य अधिकारी/अमरावती मंडळ यांनी राखुन ठेवलेले आहेत. म्हाडाचे सर्व अटी व शर्ती अर्जदार यांना लागू राहतील. या माहिती पत्राकामध्ये अनावधानाने काही तपशील राहिल्यास त्याचा फायदा अर्जदारास घेता येणार नाही. म्हाडाचे सर्व नियम व अटी अर्जदारास लागू राहतील.

१०) या कार्यालयातर्फे कोणत्याही मध्यस्थी अथवा दलालांची नियुक्ती केलेली नाही याची कृपया नोंद घ्यावी.

११) सोडतीमध्ये यशस्वी अर्जदारांना आवश्यकता असल्यास वित्तीय संसथेकडून प्रस्तावित गाळयावर कर्ज घेण्याकरीता मंडळातर्फे ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाईल.

१२) सदरहू जाहिरात हि शिल्लक गाळयासाठी ची असल्यामुळे गाळा ज्या प्रवर्गात उपलब्ध आहे त्या प्रवर्गातील अर्जदारानी अर्ज सादर करावा.

१३) सोडतीसाठी उपलब्ध असलेल्या गाळयाच्या संख्येमध्ये तसेच क्षेत्रफळामध्ये काहीबदल झाल्यास अर्जदारास तो बंधनकारक असेल.

## माहीती पत्रक, ६७४ गाळे अत्यल्प उत्पन्न गट, प्रधानमंत्री आवास योजना,अकोली,अमरावती

### -: सदनिका वाटपाची पध्दत :-

१) जाहिरातीव्दारे प्राप्त झालेल्या अर्जदारांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास, मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळयांचे हस्तांतरण व गाळयाची अदलाबदल विनिमय १९८१, च्या नियमानुसार व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणेनुसार सदनिक वाटप **प्रथम येणा-यास प्रथम पध्दतीने** वाटप करण्यात येईल.

२) जर कोणत्याही कारणास्तव गाळयाची रक्कम भरण्यास उशिर झाल्यास अर्जदारांनी गाळयाचा ताबा घेण्यापूर्वी भरावयाच्या संपूर्ण रक्कमेवर गाळयाची किंमत ठरविलेल्या दिनांकापासून ते गाळा वाटपाच्या तारखेपर्यंत योजना दराने व्याज दयावे लागेल. सदर गाळयाची किंमत डिसेबंर-२०२२ पर्यंत ठरविण्यात आलेली आहे.

३) अर्जासोबत भरावयाची रक्कम धनाकर्षव्दारे (**डी.डी.**) भरावा लागेल. धनाकर्ष (**डी.डी.**) मुख्य लेखा अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, **(Chief Accounts Officer, Amravati Housing & Area Development Board,Amravati)** / **A.H.andA.D.B.Amaravati,** अमरावती यांच्या नावाने अमरावती येथे देय असावा.

**अर्ज सादर करते वेळी अर्जासोबत करावयाची पूर्तता.**

१) जाहिरातीचे दिवशी जी व्यक्ती वयाची १८ वर्षे पूर्ण करीत असेल अशी व्यक्ती अर्ज करण्यास पात्र राहिल. वयाबाबतचा पुरावा सादर करावा लागेल.

२) अर्जदाराचे नावावर भारतात कुठेही निवासी गाळा/सदनिका/निवासी भूखंड नसल्याचे रु.१००/- च्या मुंद्राक पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे त्या शिवाय अर्ज स्विकारल्या जाणार नाही. **तसेच यापुर्वी पती/पत्नी व अज्ञान मुले यांचे नावे शासनाच्या कोणत्याही योजनेत निवासी गाळा/सदनिका/निवासी भूखंड घेतला असल्यास योजनेसाठी अर्ज करू नये. याबाबतचे सेतूमार्फत प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे.**

३) अर्जदाराने सलग २० वर्षा पैकी मागील १५ वर्षे महाराष्ट्रात वास्तव्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile)सादर करणे आवश्यक आहे.

४) सुधारीत कमाल उत्पन्न मर्यादा रुपये वार्षीक, अत्यल्प उत्पन्न गट (EWS), मुंबई, पूणे, नागपूर महानगर पालिका क्षेत्र तसेच १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्र वगळता उर्वरित महाराष्ट्रतील स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत अनुज्ञेय क्षेत्रफळ (निव्वळ चटई क्षेत्र) Carpet area, ३० चौ.मि.पर्यंत, रुपये ४,५०,०००/- पर्यंत वार्षीक. (शासन निर्णय क्र.प्रआयो-२०१९/ प्र.क्र.१२६/गृनिधो-२ दि.१४/०६/२०२२ अन्वये ) नुसार राहील.

५) "कौटुंबिक मासिक उत्पन्न" म्हणजे अर्जदाराचे स्वत:चे व त्यांची पत्नी/पती यांची मासिक प्राप्ती असल्यास दोघांचे मिळून नोकरीद्वारे अथवा उद्योगधंदयापासून, जीवितार्थाचे सर्वसाधारण साधन म्हणून जाहीरात प्रसिध्द केल्यापासून पूर्वीच्या आर्थिक वर्षाचे म्हणजे दिनांक ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२ या कालावधीत झालेल्या प्राप्तीवरून परिगणित करण्यात यावे. **उत्पन्न या संज्ञेत पगारातील मूळ वेतन,महागाई भत्ता, शहर भत्ता, बोनस आदी तत्सम भत्ते यांचा समावेश राहील.** तथापी घरभाडे भत्ता,प्रवास भत्ता,धुलाई भत्ता,अतिकालिक भत्ता,किट भत्ता,वाहन भत्ता इ. भत्ते व यासारखे भत्ते जे प्रतीपूर्तीसाठी देण्यात येतात त्यांचा समावेश असणार नाही. तसेच १२ महिण्याचे वेतन पत्र व कार्यालयाचा/मालकाचा/नियुक्ती अधिकारी यांच्या कडून १२ महिण्याचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**६) अर्जदाराचे व्यवसाय पासून उत्पन्न असल्यास व अर्जदार आय कर विवरण भरत असल्यास सन २०२१-२०२२ चे आय कर रिर्टन्सचा संपूर्ण फॉर्म व कॉम्पीटीशन,नफा-तोटा खाते/बॅलन्स शिट/ट्रेंडीग खाते इत्यांदी कागदपत्रे जोडण्यात यावीत. नौकरी करीत असल्यास कार्यालयाचा/ मालकाचा उत्पन्नाचा दाखला सादर करावा. शेती असल्यास ७/१२, पटवारीचा उत्पन्नाचा दाखला व त्यापासून प्रत्यक्ष होणारे उत्पन्नाचा तहसिलदाराचे उत्पन प्रमाणपत्र. सन-२०२१-२०२२ या आर्थीक वर्षातील, खाजगी व्यवसाय असल्यास उत्पन्नाचे तहसिलदार यांचे कडून प्राप्त उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे. तसेच वरीलपैकी जे आयकर दाते आहेत त्यांचे आयकर विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे.**

७) राखीव गटात अर्ज केलेल्या अर्जदारांनी जात प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडावी तसेच जात वैधता प्रमाणपत्र प्रमाणित करुन अर्जासोबत जोडावे. जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय प्रत्यक्ष गाळयाचा/भूखंडाचा ताबा मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

८) अर्जदाराच्या स्वत:च्या बचत खात्याचा तपशिल जसे, बँकेचे नाव,शाखा व पत्ता,खाते क्रमांक, बँकेचा MICR/IFSC क्रमांक दयावा. अर्जदारास दुस-या व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशिल देऊन अर्ज करता येणार नाही. असे केल्यास अर्ज अवैध ठरविण्यात येईल. तसेच चालू खाते, संयुक्त खाते, एन.आर.आय.खात्याचा तपशिल चालणार नाही. डिमांड डाफ्ट अर्जदाराने स्व:तच्या बँक खात्यातून काढावे.
(टिप:अर्जदाराने दुस-याकोणाही व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशिल दिल्यास असे अर्ज अवैध ठरविण्यात येतील).

९) अर्जदाराचा स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) व ई-मेल आय डी देणे बंधनकारक आहे.

१०) अर्जदाराने अर्जामध्ये स्वत:चा PAN NO. देणे बंधनकारक आहे. सदर क्रमांक चुकीचा आढळल्यास अथवा दुस-याचा पॅन कार्ड नंबर दिल्याचे आढळल्यास असे अर्ज चुकीची माहीती दिल्यामुळे कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येतील. पॅन क्रमांकाचे ऑनलाईन व्हेरीफिकीशेन आवश्यकते नूसार करण्यात येईल.

११) अर्जदार त्याच्या उत्पन्न गटानूसार पात्र असलेल्या योजना संकेतासाठी अर्ज करू शकेल. तथापी, एकापेक्षा जास्त पात्र योजनेसाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र अनामत रक्कमेसह वेगळा अर्ज भरावा लागेल. जर अर्जदार एकापेक्षा जास्त योजनेमध्ये एकापेक्षा जास्त अर्ज भरल्यास त्याला त्याला कुठल्याही एकाच सदनिकेचे वाटप करण्यात येईल.

**माहीती पत्रक, ६७४ गाळे अत्यल्प उत्पन्न गट, प्रधानमंत्री आवास योजना,अकोली,अमरावती**

१२) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घटक -३ अंतर्गत महानगरपालिकेकडे/नगरपरिषदेकडे नोंदणी करून पात्रता निश्चित झाल्याचे पत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतरच अर्ज स्विकारले जातील यांची नोंद घ्यावी.

१३) सदयस्थितीत सदर योजनेला जाहिरातीच्या दिवसापर्यंत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. अर्जदारांनी सदनिकेची पूर्ण रक्कम भरणाकेल्यानंतरही जो पर्यंत सदर योजनेस स्थानिक स्वराज्य संस्था कडून भोगवटा / वापर प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय प्रत्यक्ष सदनिकेचे वाटप करण्यात येणार नाही याची अर्जदारानी नोंद घ्यावी.

१४) सदनिकेची जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली अंदाजित विक्रि किंमत हि डिसेंबर२०२२ पर्यंत व्याजाचे भांडवली करण करुन परिगणीत करण्यात आलेली आहे. ती डिसेंबर-२०२२ पर्यंत वाटप करण्यात येणा-या सदनिकेधारकास लागू राहिल. डिसेबंर-२०२२ नंतर सदनिका वाटपा करिता कार्यकारी अभियंता/अम.मं. यांच्या विभागाकडून प्राप्त होणारी अदयावत/तात्पुरती विक्री किमंती नुसार सदनिकेची रक्कम अर्जदारास भरणे बधंनकारक असेल व त्यानंतरच सदनिकेचे वाटप करण्यात येईल. सदर गाळेधारकाचे वाटप मंजूर रोस्टर नुसार करण्यात येईल त्यामध्ये बदल होणार नाही.

१५) अर्जदारास स्थानिक महानगर पालिकाने घटक-३ अंतर्गत पात्र केल्यावर, मंडळाने मागणी केलेले कागदपत्रानुसार अर्जदाराच्या कागदपत्राची तपासणी करण्यात येईल, अर्जदार तपासणीअंती पात्र असल्यास त्यांना देकार पत्र देण्यात येईल.

१६) अर्ज संपूर्ण स्वच्छ हंस्ताक्षरामध्ये भरुन सादर करण्यात यावा अर्जावर खाडातोड असल्यास असे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत. अर्जासोबत कार्यालयाने मागणी केलेले कागदपत्रे जसे पॅन कार्ड, आधार कार्ड पती-पत्नी यांचे, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, महाराष्ट्राचा १५ वर्षाचा रहिवासी असल्याचे उप विभागिय अधिकारी (S.D.O.) यांनी निर्गमित केलेले सन २०२१-२०२२ मध्ये काढलेले असावे. घटक-३ अंतर्गत पात्र असल्याचे पत्र, राखीव प्रवर्गात अर्ज करणारे अर्जदार यांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय सदनिकेचे वाटप करण्यात येणार नाही, अर्जदार विवाहित असल्यास विवाहनोंदणी प्रमाणपत्र (स्थानिक स्वरांज्य संस्थेमध्ये नोंदणी असलेले.), बँक पासबुक/धनादेशाची छायांकित प्रत, पासपोर्ट फोटो-३, पोस्ट कार्ड साईज चा कुटूंबाचा एकत्रित फोटो, रहिवासीचा पुरावा (भाडयाने असल्यास मालका सोबत झालेल्या कराराची प्रत), व कार्यालयाने वेळोवेळी मागणी केलेले कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहेत त्या शिवाय अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची अर्जदारांनी याची नोंद घ्यावी.

**--स्वा--**

**मुख्य अधिकारी**
**अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**अमरावती**